# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर, ४९,
खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.
दूरध्वनी/फॅक्स : २६४७ ४८ ९२ , २६४७ १६ १९
ई-मेल – jtdirrom@gmail.com Website -:www.jdteromumbai.com


क्रमांक : २/ विकामुं/तंशि/आस्था(३)/२०१६/१२८१
दिनांक : 01 APR 2016

**प्रति,**
**प्राचार्य,**
अशासकीय अनुदानित पदवी व पदविका
अभ्यासक्रमाच्या संस्था.

**विषय** :- अशासकीय अनुदानित संस्थेमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर पदांवरील केल्या जाणाऱ्या नियुक्तीला संचालनालयाची मान्यता घेणेबाबत.
**संदर्भ** :- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयाचे परिपत्रक क्र.४/आस्था/सेवा/२०१६/१११, दि.२१.०३.१६

**महोदय,**

उपरोक्त संदर्भिय विषयाबाबतचे परिपत्रक पहावे.

सदर परिपत्रकान्वये मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांनी अशासकीय अनुदानित संस्थेमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर पदावरील केल्या जाणाऱ्या नियुक्तीला संचालनालयाची मान्यता घेण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

तरी आपणास कळविण्यात येते की, मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांनी संदर्भिय परिपत्रकान्वये दिलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी, अन्यथा कर्मचाऱ्याचे नियुक्तीबाबत भविष्यात होणाऱ्या प्रशासकीय/ आर्थिक/न्यायालयीन स्वरूपाच्या अडचणी निर्माण झाल्यास त्यास संबंधित संस्थाप्रमुख/ कार्यालय प्रमुख व्यक्तीशः जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी. (प्रत संलग्न).

आपला

(द.बा.जगताप)
**प्र.प्रशासकीय अधिकारी**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

प्रत : मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांना माहितीसाठी.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

नी : २६२०६०१,२६९०६०२फॅक्स: २६९२१०२E-mail : desk 4@dte.org.in web:http:// www. dte.org.in


(2015 – year of Digitized and Time- Bound Services)

परिपत्रक

क्रमांक :- ४/आस्था/सेवा/२०१६/१११

दिनांक :- 21 MAR 2016

विषय :- अशासकीय अनुदानित संस्थेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर पदांवरील केल्या जाणा-या नियुक्तीला या संचालनालयाची मान्यता घेणेबाबत........

संदर्भ :- या संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक :-

१) १२(३)/आस्था/२०१३/प्रथमनियुक्ती/६८४६ दि.७.५.२०१३.

२) ४/आस्था/कालमर्यादा/२०१५/७५ दि.३०.३.२०१५.

३) ४/आस्था/कालमर्यादा/२०१५/१६९ दि.४.६.२०१५.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भांकित परिपत्रकान्वये या संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व अशासकीय अनुदानित पदवी/पदविका संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेतर पदांवर निवड प्रक्रिया झाल्यानंतर सदरहू पदावर निवड/शिफारस केलेल्या उमेदवारांना या संचालनालयाच्या मान्यतेशिवाय नियुक्ती देण्यांत येऊ नये/रूजू करून घेण्यांत येऊ नये, संचालनालयाच्या मान्यतेशिवाय केलेल्या नियुक्तीवरील संबंधितांचे वेतन हे शासन अनुदानातून अनुज्ञेय ठरणार नाही अश्या सूचना देण्यांत आलेल्या आहेत.

तरी सुध्दा असे निदर्शनास आलेले आहे की, ब-याच अशासकीय अनुदानित पदवी/पदविका संस्था त्यांच्या संस्थेतील रिक्त पदाकरीता जाहिराती व्दारे पद भरतीची कार्यवाही पूर्ण करून संबंधितांना संस्था स्तरावर नियुक्ती आदेश निर्गमित करून त्यांना रूजू करून घेऊन शासन अनुदानातून वेतनावरील खर्च करतात. तद्नंतर काही वर्षांनी त्यांच्या नियुक्तीला कार्योत्तर मान्यतेचा प्रस्ताव या संचालनालयास सादर करतात. अथवा जर एखाद्या उमेदवाराला या संचालनालयामार्फत नियुक्तीस अपात्र ठरविले असेल तर त्यांची नियुक्ती तात्काळ संपुष्टात न आणता त्यांच्या सेवा संस्थास्तरावर सुरू ठेवतात. तसेच त्यांच्या नियुक्तीस मान्यता देण्यासाठी पत्रव्यवहार करतात.अश्या प्रकारे या संचालनालयाच्या मान्यतेशिवाय निवड/शिफारस झालेल्या उमेदवारांना संस्थास्तरावरून आदेश निर्गमित करून संस्थेत रूजू करून घेण्याची कार्यवाही करणे, या संचालनालयाने अपात्र ठरविलेल्या उमेदवारांच्या सेवा पुढे सुरू ठेवणे हे पूर्णतः नियमबाहय व गंभीरबाब आहे.

तरी या परिपत्रकान्वये सर्व पदवी /पदविका अशासकीय अनुदानीत संस्थाप्रमुखांना पुन्हा कळविण्यांत येते कि, विहित कार्यपध्दती अवलंबून पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या नियुक्तीला मान्यतेचे प्रस्ताव या संचालनालयास सादर करावेत. तसेच सदरहू उमेदवारांचे या संचालनालयाच्या मान्यतेशिवाय संस्थास्तरावरून आदेश निर्गमित करण्यांत येऊ नये व त्यांना शिफारस केलेल्या पदावर रूजू करून घेऊ नये. अन्यथा भविष्यांत कोणत्याही प्रशासकीय/आर्थिक/न्यायालयीन स्वरूपाच्या अडचणी निर्माण झाल्यास त्यांस संबंधित संस्थाप्रमुख/कार्यालयप्रमुख व्यक्तीशः जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी. तसेच सदर उमेदवारांच्या वेतनावरील खर्च शासन तरतूद/अनुदानातून अनुज्ञेय राहणार नाही व सदरचा खर्च मूल्यनिर्धारणामध्ये मान्यखर्च म्हणून ग्राहय धरले जाणार नाही. त्यांना अन्य कोणतेही सेवाविषयक /आर्थिक लाभ अनुज्ञेय राहणार नाहीत याचीही नोंद घ्यावी.

उपरोक्त प्रमाणे नियमबाहय कार्यवाही झाल्याचे निदर्शनास आल्यास त्याकरीता जबाबदार असणा-या कार्यालय प्रमुखांना/संस्थाप्रमुखांना अशा प्रकरणी जबाबदार धरून शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित केली जाईल याची नोंद घ्यावी

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत :- आवश्यक कार्यवाहीसाठी

१. सर्व सहसंचालक तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/अमरावती/औरंगाबाद/नागपूर. त्यांना कळविण्यांत येते कि, आपल्या विभागातील अशासकीय अनुदानित पदवी/पदविका संस्थांचे अनुदानाचे वार्षिक मुल्यनिर्धारण करताना संस्थेतील ज्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांच्या नियुक्तीस संचालनालयाची मान्यता नसेल त्यांच्या वेतनावरील खर्च मूल्यनिर्धारणासाठी मान्यखर्च म्हणून ग्राहय धरण्यांत येऊ नये. अन्यथा प्रस्तुत प्रकरणी उद्‌भवणा-या अनियमिततेबाबत आपणांस जबाबदार धरण्यांत येईल याची कृपया नोंद घ्यावी.

२. कुलसचिव /संचालक/प्राचार्य, सर्व स्वायत्त व अस्वायत्त अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र व तत्सम पदवी/पदविका संस्था,

३. का.क्र.४अ,७,५,८,१२ मुख्य कार्यालय, मुंबई. त्यांना कळविण्यांत येते कि, त्यांच्या कार्यासनाकडून अशासकीय अनुदानित संस्थेतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांचे संबंधीत कामकाजासंबंधीत (जसे कॅस अंतर्गत लाभ, वेतन निश्चिती, अनुदान वितरण, सेवानिवृत्ती व तद्‌अनुषंगिक लाभ, स्वेच्छा सेवानिवृत्ती, अंतिम रजा रोखीकरण,उच्च शिक्षण परवानगी इ. ) प्रकरणे असल्यास संबंधीत कर्मचा-यांचे नियुक्तीस संचालनालयाची मान्यता असल्यासच कार्यवाही करावी.